**ठळक बातम्या**

- संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी अदानी प्रकरणावरुन गदारोळ/ दोन्ही सदनांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- नवी दिल्लीत जागतिक सहकार परिषदेचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन /भविष्यात भारताच्या विकासात सहकार क्षेत्राचा सिंहाचा वाटा असेल, असा प्रधानमंत्र्यांना विश्वास

- महाराष्ट्रात मुख्यमंत्रीपदासंदर्भात अद्याप निर्णयाची प्रतीक्षा

- गेल्या दहा वर्षात ५ लाख रेल्वे कर्मचाऱ्यांची भर्ती पारदर्शक पद्धतीनं झाल्याचं रेल्वेमंत्र्यांचं नागपुरात प्रतिपादन

**आणि**

- पहिल्याच सामन्यात ऑस्ट्रेलियाचा २९५ धावांनी धुव्वा उडवत भारताची बॉर्डर गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेत विजयी सलामी

**<><><><><>**

संसदेचं हिवाळी अधिवेशन आज सुरु झालं. पहिल्याच दिवशी अदानी उद्योग समूहाच्या कथित लाचखोरी प्रकरणावरून गदारोळ झाल्यानं संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

लोकसभेत सुरुवातीला वसंतराव चव्हाण, हरिश्चंद्र चव्हाण आणि इतर दिवंगत सदस्यांना आदरांजली वाहून कामकाज काही काळ तहकूब करण्यात आलं.

पुन्हा कामकाज सुरू झाल्यानंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी कथित लाचखोरी प्रकरणाबरोबरच, उत्तर प्रदेशातल्या संभल इथल्या हिंसाचार प्रकरणावरून गदारोळ केल्यामुळे पीठासीन अधिकाऱ्यांनी सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब केलं.

राज्यसभेतही दिवंगत आजी-माजी सदस्यांना आदरांजली वाहण्यात आली. कथित लाचखोरी प्रकरणावरून विरोधकांनी स्थगन प्रस्तावाची मागणी केली होती, ती अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळून लावली. राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे तसंच डावे पक्ष, द्रमुक, राजद, आप यांच्या सदस्यांनी अदानी समूहावरच्या आरोपाबाबत बोलायचा प्रयत्न केला, मात्र त्यांना परवानगी नाकारण्यात आली. संविधानदिनानिमित्त उद्या दोन्ही सभागृहांचं कामकाज होणार नाही.

**<><><><><>**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात विधायक चर्चा होईल, अशी आशा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे. ते आज अधिवेशन सुरू होण्याआधी प्रसारमाध्यमांशी बोलत होते. भारतानं संविधान स्वीकारून ७५ वर्षे झाली आहेत हे यंदाचं वैशिष्ट्य असून यासह अनेक कारणांसाठी हे अधिवेशन विशेष असेल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

भविष्यात भारताच्या विकासात सहकार क्षेत्राचा सिंहाचा वाटा असेल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केला. नवी दिल्ली इथं भारत मंडपम इथे आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. सहकारी संस्थांना बहुउद्देशीय आणि बळकट बनवण्याचा आपला प्रयत्न करणार असून

त्यासाठी दोन लाख गावांमधे सहकारी संस्था स्थापन करण्याचा विचार असल्याचं ते म्हणाले.

प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्त एका विशेष टपाल तिकीटाचं प्रकाशनही झालं. या वेळी भूतानचे प्रधानमंत्री दाशो शेरिंग तोबगे, फिजीचे उप प्रधानमंत्री मनोआ कामिकामिका आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उपस्थित होते.

<><><><><>

विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर राज्यात सत्तास्थापनेबाबत विविध पातळ्यांवर चर्चा सुरु आहे. महायुतीतल्या शिवसेनेच्या गटनेतेपदी विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतेपदी अजित पवार यांची निवड कालच झाली. मात्र भाजपा विधिमंडळ पक्षाची नेतानिवड अद्याप बाकी आहे. ती झाल्यावर मुख्यमंत्रिपदाबाबतचा निर्णय होईल, असं अजित पवार यांनी आज सातारा जिल्ह्यात कराड इथं सांगितलं.

विधानसभा निवडणुकीत भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तिन्ही पक्षांचे नेते एकत्र चर्चा करुन मुख्यमंत्रीपदाविषयी निर्णय घेतील, असं राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार प्रफुल पटेल यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या विधिमंडळ गटनेतेपदी आमदार आदित्य ठाकरे यांची निवड करण्यात आली. तसंच विधानसभेच्या गटनेतेपदी आमदार भास्कर जाधव यांची तर प्रतोदपदी आमदार सुनील प्रभू यांची निवड झाल्याची माहिती विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिली.

<><><><><>

नयी चेतना 3.0 मोहिमेअंतर्गत १४ राज्यांमधील २२७ लिंगभाव संसाधन केंद्राचं आज केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी नवी दिल्लीत उद्घाटन केलं. ही मोहिम २३ डिसेंबरपर्यंत सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये चालणार आहे. एक साथ, एक आवाज, हिंसा के खिलाफ असं या मोहिमेचं घोषवाक्य आहे.

महिलांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक सक्षमीकरणासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं चौहान यांनी सांगितलं. देशातील लिंग-आधारित हिंसाचार नष्ट करण्यासाठी सर्वांनी एकत्रित येऊन आवाज उठवावा,असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

देशाच्या संविधानाचा अमृतमहोत्सव यंदा साजरा करण्यात येणार आहे. उद्यापासून २५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत वर्षभर त्याअंतर्गत विविध कार्यक्रम होतील. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आज नवी दिल्ली इथं बातमीदारांना या बाबतची माहिती दिली. दिल्लीतल्या संविधान सदनाच्या मध्यवर्ती सभागृहात एक भव्य कार्यक्रम आयोजित केला असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू त्यावेळी संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला संबोधित करतील. हा उत्सव देशाचा असून नागरिकांनी त्यात उत्साहाने सहभागी व्हावं असं आवाहन रिजिजू यांनी केलं.

"हमारा संविधान हमारा स्वाभिमान" हे या अभियानाचं घोषवाक्य आहे. संविधान साकारण्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं योगदान तसंच मसुदा समितीतल्या १५ महिला सदस्यांच्या लक्षणीय कामगिरीचा गौरव करणं या अभियानाचं उद्दिष्ट आहे. असं केंद्रीय विधी आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी सांगितलं.

या महोत्सवानिमित्त Constitution75.com हे समर्पित संकेतस्थळ सुरु केलं असून त्यावर विविध प्रकारातून संविधानाविषयीची माहिती उपलब्ध आहे.

संविधानाची उद्देशिका वाचतानाच्या ध्वनिचित्रफिती या संकेतस्थळावर कोणलाही चढवता येतील. तसंच त्यावर उपलब्ध प्रश्नमंजुषा सोडवून प्रमाणपत्र मिळवता येईल.

**<><><><><>**

उद्याच्या संविधानदिनानिमित्त आज नवी दिल्लीत हमारा संविधान हमारा स्वाभिमान पदयात्रा काढण्यात आली. डॉ. मनसुख मांडवीय, पीयुष गोयल, अर्जुन राम मेघवाल, किरेन रिजिजू, गजेंद्रसिंग शेखावत, रक्षा खडसे या केंद्रीय मंत्र्यांसह अनेक खासदार त्यात सहभागी झाले होते.

**<><><><><>**

संविधानाचा सन्मान केवळ संविधानाचं पुस्तक दाखवून होत नाही तर संविधानाचा सन्मान नतमस्तक होऊन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला होता, असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज सांगितलं. ते नागपूर इथं अखिल भारतीय अनुसूचित जाती- अनुसूचित जमाती रेल्वे कर्मचाऱ्यांच्या राष्ट्रीय अधिवेशनात बोलत होते.

२००४ ते २०१४ या १० वर्षात रेल्वेमधे ४ लाख ४० हजार कर्मचाऱ्यांची भर्ती झाली होती परंतु २०१४ ते २०२४ या दहा वर्षाच्या काळात ५ लाख रेल्वे कर्मचाऱ्यांची भर्ती पारदर्शक पद्धतीनं झाली आहे.

**<><><><><>**

संविधान सभेतल्या वादविवादापासून प्रेरणा घेत सभागृहाच्या सदस्यांनी संसदेच्या शिष्टाचाराचं पालन करावं, असं आवाहन लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी आकाशवाणीला दिलेल्या विशेष मुलाखतीत केलं.

**<><><><><>**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आज रोम इथं फ्रान्सचे परराष्ट्र मंत्री जीन नोएल बॅरोट यांची भेट घेतली. यावेळी उभय नेत्यांमध्ये भारत आणि फ्रान्स

देशांतील भागीदारी, युक्रेन आणि जागतिक समस्यांवर चर्चा झाली. डॉक्टर जयशंकर यांनी भूमध्य संवाद परिषदेवेळी लेबनॉनचे परराष्ट्रमंत्री अब्दुल्ला बोहबीब आणि क्रोएशियाचे परराष्ट्र मंत्री गॉर्डन ग्रलिक रेडमॅन यांच्याशीही चर्चा केली.

<><><><><>

खरीप हंगामातल्या भरघोस पीक उत्पादनामुळे अन्न चलनफुगवट्याचा दर कमी होऊ शकेल, असं केंद्रीय अर्थ मंत्रालयानं ऑक्टोबरच्या आर्थिक आढाव्यात म्हटलं आहे. खाद्य तेल, टॉमेटो, कांदा आणि बटाटे यांच्या दरातली घसरण तसंच मागणीत सातत्यानं होणारी वाढ उत्पादन आणि  सेवा क्षेत्रांची उत्तम कामगिरी या घटकांचाही महागाई कमी होण्यात वाटा आहे, असं या अहवालात नमूद केलं आहे.

<><><><><>

भारतीय जागतिक मंच मध्य पूर्व राष्ट्र आणि अफ्रिका या उपक्रमाचं उद्घाटन आज दुबईत झालं. अमर्याद क्षितिजे ही यावर्षीच्या या उपक्रमाची संकल्पना आहे. दोन दिवस चालणाऱ्या या मंचाचे उद्दिष्ट तंत्रज्ञान, वित्त, शाश्वतता आणि नवोन्मेष यासह प्रमुख क्षेत्रांमध्ये भागीदारी मजबूत करणे आहे.

<><><><><>

बॉर्डर- गावस्कर करंडक कसोटी मालिकेतल्या पहिल्या क्रिकेट सामन्यात आज भारतानं ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय मिळवला. त्यामुळे भारतानं पाच सामन्यांच्या मालिकेत १- शून्यने आघाडी घेतली आहे. ऑस्ट्रेलियात पर्थ इथं झालेल्या सामन्यात भारतानं यजमान संघाला २९५ धावांनी धूळ चारली. हा विजय भारताचा सगळ्यात मोठ्या कसोटी विजयांपैकी एक ठरला. भारताचा कर्णधार जसप्रित बुमरा आणि मोहम्मद सिराज  यांनी प्रत्येकी तीन गडी बाद केल्यामुळे

ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव केवळ २३८ धावांमधे गुंडाळला गेला. बुमरा सामनावीर ठरला.

तत्पूर्वी विराट कोहलीची नाबाद शतकी खेळी आणि यशस्वी जयस्वालच्या १६१ धावांच्या दमदार खेळाच्या जोरावर भारतानं ऑस्ट्रेलियापुढं विजयासाठी ५३४ धावांचं मोठं आव्हान ठेवलं होतं. दुसरा कसोटी सामना ६ डिसेंबरपासून अडलेड इथं सुरू होईल.

//<><><><><>//